दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २२५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 14 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 225 | Pages 4 | Rate 4 Rs



# चला,डॉ.बाबासाहेबांच्या संगतीत राहूया!

महामानव कालातीत असतात. ते आपल्या अस्तित्वाने आपला वर्तमान फुलवून टाकतात आणि भविष्यकाळ अजिवन जागृत करून जातात. वृक्षाप्रमाणे स्वतः अंगावर ऊन, वारा, पाऊस झेलून भविष्याला महान विचारांची सावली, ग्रंथरूपी सुगंध आणि विचारांची फळे अनंत काळासाठी आपल्याला विनामुल्य मागे ठेवून जातात. सज्जनहो, आज आपण बोधिसत्व, महामानव, प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना सर्वांनीच त्यांची नित्य संगत करणे काळाची गरज बनली आहे. भारत मातेच्या वीर पुरुषांच्या अहोरात्र संघर्ष, कष्टाने आणि रक्ताने स्वतंत्र झालेली भारत माता आणि तिचे स्वातंत्र्य आपल्याला अबाधित, चिरकाल ठेवतांना इथला क्रांतीचा, नवनिर्माणाचा, स्वातंत्र्याचा विचार चिरंतन, जिवंत ठेवावा लागणार आहे. मित्रहो, सत्याच्या, क्रांतीच्या मार्गावर चालणाऱ्या लोकांसाठी काळ नेहमीच खडतर असतो. ज्या ज्या महापुरुषांनी जगाला नवा, सत्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला त्यांच्या जीवनात त्यांना प्रचंड संघर्ष करतांना त्यांच्या जीवनाचा शेवट गोड झालेला आढळत नाही. अगदी सॉक्रेटीस, रोमेल, येशू ख्रिस्त, नामदेव, ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ, जोतीबा, सावित्रीबाई, बाबासाहेब आणि अलीकडच्या समाजसुधारकांचा शेवट खडतर झालेला इतिहासाला माहिती आहे. याचा अर्थ काळ बदलला की; सत्याची कास धरणारी नवीन माणसे निर्माण व्हायला पाहिजेत की नाही? हा सतत बोचणारा प्रश्न मला नेहमीच सतावत असतो. आज काल सगळीकडे केवळ चर्चा-प्रतिक्रिया देणाऱ्या टोळ्या सर्वत्र दिसताहेत, मात्र कुणीही मांजराच्या गळ्यात घंटा बांधायला धजावत नाही. ठीक आहे. हे ही दिवस जातील. असे असले तरी अलीकडच्या दहा वर्षात माणसं प्रचंड बदलली आहेत. एकीकडे क्रांतीच्या वल्गना करतांना दुसरीकडे माणूस भ्रांती हरवत चाललाय. वेगवेगळे इझम आणि विविध जात, धर्म, पंथाच्या कट्टरता माणसातील खरा माणूस



झाकाळून टाकताहेत. अगोदरही माणसांचे संघर्ष होते, परंतु त्याला एवढे टोकदार रूप नव्हते. टिळक-आगरकर, गांधी-आंबेडकर इत्यादी विचारवंत धुरीणामध्ये मतभेद होते परंतु मनभेद मात्र नव्हते. ही सगळी माणसे आपल्या वैचारिक अधाष्ठानावर ठाम असतांना कधीही कुणी हिंसेचा मार्ग अवलंबिलेला वाचनात नाही. आज मात्र चित्र प्रचंड बदलले आहे. जात, धर्म, रंग या बाबतीत माणसे कट्टर झालेली पाहून येणारा काळ कसा असेल(?) याची भीती वाटते! जात, धर्म, रंग याला अती स्वार्थ आणि राजकारणाची जोड दिली की त्याचे बीभत्स स्वरूप समोर येत असते. जगाला प्रेम अर्पावे सारखे काव्य, वसुधैव कुटुंबकम वचन किंवा सत्यम शिवम सुंदरम सारखी गीते कालबाह्य होऊन फक्त ऐकायलाच शिल्लक राहतील का? असा प्रश्न मनाला पडतो. त्यात कविवर्य इंद्रजीत भालेराव सरांच्या 'गर्भखुणा' कवितेतील

हे सिद्धच झालंय की
लोकांना प्रेम नकोय विद्वेष हवाय
पण असं कसं होऊ शकतं ?
विचार करणाऱ्या प्रत्येकाला हा प्रश्न पडलाय

ह्या ओळी आणखीनच अस्वस्थ आणि अंतर्मुख करतात. असे असले तरी महापुरुष आपल्या देदीप्यमान चारित्र्य आणि चरित्राने आपल्यासोबत धीरोदात्तपणे उभे असतात हे विसरून चालणार नाही. त्यातल्या त्यात डॉ.भीमराव रामजी आंबेडकरांसारखा प्रज्ञावंत महामानव नित्य सोबतीने असल्यास आपल्याला खडतर काळात अवघड होत चाललेला रस्ता सुकर व्हायला लागतो. अगदी वयाच्या नवव्या वर्षापासून संघर्षात वाढलेल्या बाबासाहेबांना आपल्याला आपले सन्मित्र बनवावे लागेल. बाबासाहेबांचा एक एक दिवस आणि त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगाची जाण आणि भान ठेवून त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य सोबत बाळगावे लागेल. जगातली देखणी असणारी बाबासाहेबांची लेखणी आपल्याला सोबत बाळगावी लागेल. जगात आतापर्यंत या लेखणीने अनेक क्रांतीची बीजं पेरली आहेत. त्यासाठी आपण बोधीसत्वाच्या लेखणीचा वारसा जपणे काळाची गरज आहे. अलीकडे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे; परंतु त्याप्रमाणात क्रांतिकारी, सडेतोड लेखनाचे प्रमाण अत्यल्प होत चालले आहे. शिकलेल्या लोकांनी आपल्या रोखठोक लेखणी म्यान केल्यामुळे इथे अविचाराचे तणकट फोफावले आहे. त्याच्या जोडीला त्याग नावाची कृती तर कुठेच दिसायला तयार नाही. पोटार्थी आणि जगण्याला हापापलेली माणसे कधीच क्रांती करू शकत नाहीत. त्यासाठी लेखणी आणि विचाराला त्यागाची जोड दिल्यास क्रांती फार दूर नाही. नक्कीच यात काही निरपराध, निष्पाप, विचारवंत लोकांचे बळी जातील, पण तेच नव्या पिढीचे नवे महात्मे असतील! क्रांतिकारी, नवीन महात्मे आणणार तरी कुठून?

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ भाषण, मिरवणूक, लेख, पुस्तके छापण्याचे विषय नसून तो जीवनात अंगीकारण्याचा एक सर्वोत्तम, महान मार्ग आहे. भीम विचारांचा वसा घेणे काळाची गरज बनली आहे.

भिम माझा जीव आहे
गोर गरिबांची कीव आहे
विचारतोस काय गड्या?
भीम भारत जाणीव आहे

असे लिहून, हा महान विचार नित्य सोबत बाळगावा लागेल. सत्यासाठी जीवनात संघर्ष, लोकांना अंगावर घेणे याची सवय लावून घ्यायची असेल तर बाबासाहेबांची सतत संगती अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने भारतीय संविधान आपला जीव की प्राण आहे! असे समजून त्याच्या रक्षणासाठी सदैव तत्पर आणि सज्ज असलेच पाहिजे. आता आपल्याला अभ्यास करून नवीन संविधान लिहिण्याची गरज नाही. फक्त डोळ्यात तेल घालून मोफत मिळालेला हा अनमोल खजाना जपावा लागणार आहे. असे करतांना आपल्यात कोणतीही कट्टरता येता कामा नये.बाबासाहेबांचा एक एक विचार आणि महान ग्रंथ संपदा आपल्याला सोबतीने ठेवावी लागेल. असे असले तरी त्यांची व्यासंगी वृत्ती, जिद्द, चिकाटी आणि एखाद्या विषयाचे संशोधन करून त्याची मांडणी कशी करावी? हे ही शिकून घ्यावे लागेल. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी कसे जावे? त्याची सोडवणूक कशी करावी? हे आपल्याला त्यांच्याकडून शिकावे लागेल. असे असले तरी बहुजनांचे विखुरलेले संघटन मजबूत करावे लागेल. विविध जाती, धर्मातील विखुरलेल्या आंबेडकरवादी लोकांची एक वज्रमुठ बांधावी लागेल. आपला संघर्ष कुण्या व्यक्ती विरुद्ध न उभारता सर्वांनी एकजुटीने देशाच्या उत्थानासाठी काम करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी इथे प्रत्येकाला आपल्यातील 'मी' बाहेर काढून 'आम्ही' व्हावे लागेल. या वेळी केवळ देश हा धर्म सोबत असायला हवा.

बाबासाहेबांची प्रज्ञा, शील, करुणा हे तीन मूलगामी शस्त्र सोबत बाळगतांना आपले स्वत्व बाजूला ठेवावे लागेल. मोठ्या मनाने बाहेर यावे लागेल. अगोदर सामाजिक लढाई एकोप्याने लढून लोकांमध्ये नवे स्फुल्लिंग चेतवावे लागेल. सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडतांना महाग होत चाललेले जगणे स्वस्त करावे लागेल. लोकांनी आपल्या गरजा मर्यादित कराव्या लागतील. व्यसने, भपकेबाजपणा, खोटा मोठेपणा, कुवत नसतांना खर्च करण्याची सवय इत्यादी बाबतीत समाज जागृत करावा लागेल. लोकांना आपल्या मर्यादांची जाणीव करून द्यावी लागेल. फुकटचे, स्वस्तातले, सरकारी योजनांवर जगणे मर्यादित करण्याचे प्रबोधन करावे लागेल. असे झाल्यास माणूस सरकार अथवा एखाद्या व्यक्तीवर अवलंबून राहणार नाही. त्याला कष्ट करायची आणि कष्टाचे खायची सवय लागेल! मागण्याच्या वृत्तीला आळा बसेल. स्वाभिमान जागृत होईल! असे होणे म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संगती लागणे होय! चला तर मग, बाबासाहेबांसोबत आनंदी जगूया! जय भिम!

**-प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,**
**सोनपेठ,जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो. ९१५८०६४०६८**

# लोकशाही हा भारताच्या संविधानाचा प्राणवायू

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधानात मानवीय दृष्टिकोनातून सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध कलमाद्वारे अनेक तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. ज्यात जात, धर्म, वंश, लिंग, परंपरा, प्रांत, भाषा इत्यादी बाबी वरून भेदभाव पाळता येणार नाही. तसेच सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय प्रदान केलेले आहे. भारताच्या संविधानाविषयी व्यक्त होत असताना केवळ 'संविधान', 'सविधान' असे एकेरी संबोधून चालणार नाही तर भारताचे संविधान असे स्पष्ट म्हटले पाहिजे. तशी तरतूद कलम क्रमांक ३९३ मध्ये केलेली आहे. ज्यामुळे भारतापासून संविधान किंवा संविधानापासून भारत वेगळे करता येणार नाही. तसे कोणी केले तर ते कुठल्या संविधानाविषयी बोलत आहेत, याचा अर्थ बोध होणार नाही. परिणामी समाज जीवनात चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे. याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती, म्हणून त्यांनी यासाठी स्वतंत्र एक कलम लिहून तशी तरतूद केलेली आहे. १९ जानेवारी १९३१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत स्पष्ट केले होते की, कुठल्याही देशाच्या राजकीय जीवनाचे सुसूत्रीकरण करीत असताना उत्तरदायी शासन व प्रातिनिधिक सरकार या दोन मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यांच्यामार्फत लोकशाहीची अंमलबजावणी करायची असेल तर याच परिषदेत स्पष्ट केल्याप्रमाणे, मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एकाधिकारशाहीचा विध्वंसक आहे. या विधानाची समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. १८ व १९ जुलै १९४२ ला नागपूर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत द्वितीय विश्व युद्धाच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ते लोकशाही आणि हुकूमशाही यामधील युद्ध असल्यामुळे नाझी हुकुमशाही नष्ट करण्यासाठी विनाअट युद्धात सहभागी होण्यासाठी समर्थन दिले पाहिजे. कारण जगाच्या पाठीवरून माणसा माणसातील संबंधाचे योग्य पालन करविणारे लोकशाहीचे तत्व नष्ट होऊ नये, म्हणून तशी भूमिका घेणे कर्तव्य दृष्टिकोनातून आवश्यक होते. केवळ लोकशाहीवर खंबीर विश्वास असून भागणार नाही तर समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तत्त्वांची जोपासना करणाऱ्यांना आपण सहकार्य केलेच पाहिजे. जेणेकरून लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच आपणास लाभतील, अन्यथा लोकशाही मेली तर आपला विनाश अटळ आहे. यावर शंका असण्याचे काहीही कारण नसावे. ४ नोव्हेंबर १९४८ ला प्रस्तावित संविधानाच्या मसुद्यावर करण्यात आलेल्या सर्व आक्षेपांना उत्तर दिल्यानंतर या अनुषंगाने आपली भावना व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मसुदा समितीने निर्माण केलेले संविधान देशासाठी निश्चित चांगले, व्यवहार्य, लवचिक असून देशाला शांतता आणि युद्धजन्य या दोन्ही परिस्थितीत एकसंघ ठेवण्यासाठी पुरेसे समर्थ व सक्षम असताना संविधानांतर्गत काही चुकीच्या गोष्टी घडल्या तर संविधानात दोष होता असे म्हणता येणार नाही, उलटपक्षी त्याची अंमलबजावणी करणारी माणसे दुष्ट होती, असेच म्हणावे लागेल.३ ऑक्टोबर १९५४ ला आकाशवाणी दिल्ली केंद्रावरून दिलेल्या संदेशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनाचे तात्त्विक अधिष्ठान स्पष्ट करताना बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांचा अंगीकार केलेला आहे. त्यातील स्वातंत्र्य आणि समता याच्या मर्यादा लक्षात घेता बंधुभाव अर्थात सहभाव याला सर्वोच्च स्थान दिलेले आहे. राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत सूचित केलेला ध्येयवाद आणि धर्मात अंतर्भूत केलेला सामाजिक ध्येयवाद यात विसंगती असल्याचे स्पष्ट करून सामाजिक जीवनातील व्यवहारात प्रचलित सनातनी वृत्तीच्या सामाजिक ध्येय्यवादामुळे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव नाकारली गेली असली तरी राजकीय ध्येयवादामुळे या जीवनमूल्यांना मान्यता मिळालेली आहे. अशा परिस्थितीत बहुसंख्य भारतीयांचा राजकीय ध्येयवाद हा सर्वांचा सामाजिक ध्येयवाद होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ज्यातून भारताचे संविधानात अंतर्भूत असलेली सर्व उद्दिष्टे साकार होऊ शकतील.भारताच्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेत दिलेल्या शेवटच्या भाषणात असा इशारा दिला होता की, राजकीय पक्षांनी स्वतःच्या तत्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. करिता रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण कटिबद्ध असले पाहिजे.२० मे १९५६ ला व्हॉइस ऑफ अमेरिका यांना नभोवानी केंद्रावरून केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय? हे स्पष्ट करताना म्हणतात की, लोकशाही ही, गणराज्यापेक्षा तसेच संसदीय शासनापेक्षा पूर्णता भिन्न असून ती सहजीवनाची एक पद्धत आहे. भारतीय समाजात जातीव्यवस्था असल्याने सामाजिक मूल्यांना अर्थात लोकशाहीला हद्दपार करण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत लोकशाही रुजवायची असेल तर क्रमिक असमानतेवर आधारलेली जाती व्यवस्था नष्ट करावी लागेल. १५ ऑक्टोबर १९५६ ला नागपूर कार्पोरेशन च्या वतीने मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला होता. त्याप्रसंगी मानपत्राला उत्तर देताना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजकारणात भक्तीला विभूतीपूजेचे रूप आले की सर्वाधिकारशाही निर्माण होण्याचे भय असते. यातून लोकशाही बळकट करणे किती कठीण आणि महत्त्वपूर्ण आहे? हे आपल्या लक्षात येते. म्हणून आपण फार जागृत असले पाहिजे, असा संदेशात्मक इशारा दिला होता. करिता देशाचे नेतृत्व बुद्धिमान, कणखर, प्रामाणिक आणि देश कार्य करणारे इमानदार असावे. भारताचे संविधान हे सामाजिक क्रांतीचे वाहन असून वैध तरतुदींचा कायदेशीर दस्तावेज आहे. याची परिपूर्ण अंमलबजावणी केली तर समाज जीवनात वेगाने अमुलाग्र क्रांतिकारक बदल होण्याची दाट शक्यता आहे. ज्यातून वैश्विक बंधुत्व विकसित होऊ शकेल. करिता याची मार्मिकता मानवीय मनात प्रतिबिंबित करण्यासाठी संबंधित विचाराच्या अनुषंगाने मानवी मनाची मशागत केली पाहिजे. ज्या संविधानावर संपूर्ण देश चालतो ते भारताचे संविधान देशातील बहुतांश नागरिकांना माहीत नसावे. यापेक्षा मोठी शोकांतिका काय असू शकेल? म्हणून लोकशाही हा भारताचे संविधानाचा प्राणवायू आहे, याची जनतेला व्यवस्थे मार्फत जाणीव करून दिली पाहिजे. अन्यथा प्राणवायु शिवाय सजीवाचा मृत्यू निश्चित आहे. तसेच लोकशाहीचा मृत्यू सुद्धा निश्चित असेल, याचे आपण भान ठेवले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररीत दिलेल्या संदेशात संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी आणि शर्तीचे मार्गदर्शन केलेले आहे. त्यातील पहिली अट म्हणजे समाजामध्ये भयानक विषमता असता कामा नये, ज्यात रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात. त्यामुळेच अब्राहम लिंकन



यांनी गेटीस बर्ग येथील भाषणात ढासळलेले घर उभे राहू शकत नाहीअसे म्हटले होते. दुसरी अट म्हणजे विरोधी पक्षाचे मजबूत अस्तित्व होय. अर्थात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात नकाराधिकार वापरण्याची तरतूद होय. तिसरी अट म्हणजे कायद्यासमोर सर्व माणसे समान असतात, म्हणून कायदा आणि प्रशासन हे निष्पक्ष असायला हवे. ज्यामुळे शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार प्रशासनाला काटेकोरपणे अंमलबजावणी करता येईल. चौथी अट म्हणजे संविधानिक नैतिकता होय. या अनुषंगाने विचार करता भारताचे संविधान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून वैध तरतुदीचा दस्तावेज आहे. त्या दस्तावेजाचे मर्म म्हणजे संविधानिक नैतिकता होय. हे स्पष्ट करण्यासाठी अमेरिकेचे संविधान तयार झाल्यानंतर निवडण्यात आलेले पहिले राष्ट्रपती जॉर्ज वाशिंग्टन यांचे उदाहरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले आहे. ते यासाठी की, त्यांनी राष्ट्रपतीपदाची मुदत संपल्यानंतर दुसऱ्यांदा निवडणूक लढविण्यास नकार दिला होता. जेव्हा की, त्यांनी दहा वेळेस निवडणूक लढविली असती तरी प्रतिस्पर्ध्याशिवाय बिनविरोध निवडून आले असते. मात्र त्यांनी नकार दिला होता, हे नैतिकतेचे उच्च कोटीचे उदाहरण आहे. पाचवी अट म्हणजे नैतिक सुस्थिती होय, ज्यात बहुसंख्यांक सत्ताधीश अल्पसंख्यांकावर अन्याय करणार नाहीत. सहावी अट म्हणजे नैतिक अधिष्ठान होय. ज्या अंतर्गत कायद्याने केलेली तरतूद फलदायी ठरणारी परिस्थिती उपलब्ध व्हावी. सातवी अट म्हणजे लोकनिष्ठा होय. अर्थात लोकनिष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा होय. म्हणून भारताचे संविधानाच्या अंमलबजावणीसाठी आपण फारच सावध आणि समजूतदारपणे वागले पाहिजे. सदरील भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीच्या व्याख्याविषयी बोलताना 'चर्चेतून चालणारे शासन' अशी लोकशाहीची व्याख्या करणारे वॉल्टर बेग हॉट यांना उद्गृत केले आहे. ज्यांनी ब्रिटिश संविधानावर आधारित लिखित स्वरूपात तत्कालीन परिस्थितीत लोकशाहीचा सत्य आराखडा सांगण्याचा आधुनिक प्रयत्न केला होता. तसेच अब्राहम लिंकन यांनी गेटीस बर्ग येथील भाषणात 'लोकांचे, लोकांनी व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.' असे म्हटले होते, याचीही नोंद घेतली होती. तद्वतच 'रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही असे म्हणतात.' हे स्पष्ट केले होते. त्याचे आपण अनुसरण केले पाहिजे. करिता राज्यकर्त्यांनी देशातील सर्व नागरिकांना याची परिपूर्ण जाणीव व्हावी म्हणून स्वतंत्र उपाय योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून संबंधित मूल्यांचा प्रचार आणि प्रसार होऊ शकेल. करिता केंद्र व राज्य सरकार अंतर्गत देशातील सर्व शैक्षणिक संस्था तसेच सरकारी, खाजगी, केंद्रीय व स्वायत्त विद्यापीठातील अभ्यासक्रमात लोकशाहीयुक्त भारताचे संविधानाचा समावेश केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ एप्रिल १९३८ ला मी प्रथमतः भारतीय व अंतिमत: ही भारतीय आहे. असा संदेश दिला होता. याची जाणीव देशातील सर्व नागरिकांना व्हावी म्हणून भारताचे संविधानाच्या सरनाम्याची सुरुवात आम्ही भारताचे लोक अशी करण्यात आलेली आहे. जेणेकरून हे संविधान त्यांना आपल्यासाठी आहे, असे वाटायला हवे. परिणामी या देशातील नागरिक भारताचे संविधान अबाधित ठेवण्यासाठी आपली भूमिका नीट पार पाडू शकतील. या आशा आणि अपेक्षासह आपण सर्वांना फुले-आंबेडकर जयंतीच्या कोटी कोटी सदिच्छा व्यक्त करतो. आणि शेवटी मी माझ्या शब्दांना येथे थांबवतांना डावीकडे वा उजवीकडे न वळता केवळ आणि केवळ जय भीम, जय भीम आणि जय भीम च्या अभिवादनाने आपण सरळ जय भीम कडेच वळले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**-लेखक : बी.बी.मेश्राम**

# हत्याराविना कोट्यावधींच्या मनांवर राज्य करणारे: डॉ.बाबासाहेब आंबेडकर

जगाच्या इतिहासात सत्ता, साम्राज्य आणि 'राजा' या संकल्पना बहुधा तलवार, रक्तपात आणि जिंकलेल्या भूभागाशी जोडल्या गेल्या आहेत. अलेक्झांडर, चंगेज खान, नेपोलियन या साऱ्यांनी आपापल्या सामर्थ्याने जग जिंकण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या विजयामागे तलवारीचा धाक आणि हिंसेची सावली होती. मात्र या सर्वांच्या पलीकडे एक असा 'राजा' जन्माला आला, ज्याने ना कोणती तलवार उचलली, ना कोणावर आक्रमण केले; तरीही कोट्यावधी लोकांच्या मनांवर अधिराज्य गाजवले, तो म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

बाबासाहेब 'राजा' होते, पण सिंहासनावर नव्हे; ते होते विचारांच्या सिंहासनावर. त्यांनी सत्ता गाजवली, पण राज्यकर्त्यांसारखी नव्हे, तर समाजमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या विचारवंतासारखी. त्यांनी जिंकले पण युद्धभूमीवर नव्हे, तर अन्यायाविरुद्धच्या संघर्षात, ज्ञानाच्या शक्तीने आणि तर्काच्या धारदार अस्त्राने. डॉ. आंबेडकरांचा जन्म समाजाच्या सर्वात तळागाळातील, अस्पृश्यतेच्या अमानुष बेड्यांत अडकलेल्या कुटुंबात झाला. ज्या समाजाने माणसाला माणूस म्हणून मान दिला नाही, त्या समाजात जन्म घेऊनही त्यांनी जगाला मानवतेचा खरा अर्थ शिकवला. त्यांच्या आयुष्याची सुरुवात अपमान, तिरस्कार आणि बहिष्काराने झाली. शाळेत पाणी पिण्याचा हक्क नव्हता, वर्गात बसण्याची जागा नव्हती, समाजात मान-सन्मान नव्हता. पण या साऱ्यांनी त्यांचा आत्मविश्वास खचवला नाही; उलट त्या अन्यायानेच त्यांच्या मनात क्रांतीची ठिणगी पेटवली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा मंत्र घोषवाक्य नव्हता, तर जीवनाचा पाया होता.

शिक्षणाला त्यांनी केवळ वैयक्तिक उन्नतीचे साधन मानले नाही, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी अस्त्र बनवले. कोलंबिया विद्यापीठापासून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सपर्यंत त्यांनी ज्ञानाची शिखरे गाठली; पण त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर वंचित, शोषित आणि पीडित समाजासाठी केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान केवळ कायदे लिहिण्यापुरते मर्यादित नाही. त्यांनी भारताच्या भवितव्याची दिशा ठरवली. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी राज्यघटनेतून मूर्त रूप दिले. प्रत्येक भारतीयाला 'मानव' म्हणून जगण्याचा अधिकार त्यांनी दिला, हीच त्यांची खरी सत्ता. आज आपण ज्या लोकशाहीत जगतो, तिची भक्कम पायाभरणी बाबासाहेबांनी केली आहे. मतदानाचा अधिकार, समानतेचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य



हे सर्व त्यांच्या विचारांचेच फलित आहे. ही सत्ता तलवारीने मिळवलेली नाही; ती मिळवलेली आहे संघर्ष, अभ्यास आणि तत्त्वनिष्ठतेच्या बळावर.

बाबासाहेबांचे कार्य केवळ राज्यघटनेपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली. अस्पृश्यता, जातिभेद आणि अंधश्रद्धांविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे लढा दिला. जातिव्यवस्था ही मानवतेवरचा कलंक आहे, असे ठामपणे सांगत त्यांनी परंपरांना प्रश्न विचारले, धर्मालाही आव्हान दिले आणि समाजाला नव्या विचारांकडे वळवले. महाडचा चवदार तळ सत्याग्रह असो किंवा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन, प्रत्येक संघर्षात त्यांनी न्यायासाठी आवाज उठवला. त्यांनी हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही; पण त्यांच्या विचारांची धार इतकी तीक्ष्ण होती की अन्यायाच्या भिंतीच हादरल्या. त्यांची क्रांती शांत होती पण परिणामकारक होती. 'एनिहिलेशन ऑफ कास्ट' सारख्या लेखनातून त्यांनी समाजातील विषमता उघड केली. त्यांचे विचार एका समाजापुरते मर्यादित नव्हते तर ते संपूर्ण मानवजातीसाठी होते.

आजच्या काळात बाबासाहेबांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. प्रगतीच्या युगातही विषमता आणि अन्याय कायम आहे. अशा वेळी त्यांचे विचारच आपल्याला दिशा देतात. ते सांगतात खरा विकास आर्थिकच नव्हे, तर सामाजिक आणि मानसिकही असतो. दुर्दैवाने, आज बाबासाहेबांना अनेकदा पुतळ्यांपुरते मर्यादित केले जाते. जयंतीला मिरवणुका निघतात, कार्यक्रम होतात पण त्यांच्या विचारांचे आचरण कितपत होते, हा प्रश्न कायम आहे. त्यांचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुसरण. त्यांनी दिलेली सर्वात मोठी शिकवण म्हणजे स्वाभिमान. जोपर्यंत तुम्ही स्वतःला कमी समजता, तोपर्यंत कोणीही तुम्हाला उचलू शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच जिवंत आहे. त्यांनी समाजाला आत्मभान दिले, स्वत्वाची जाणीव करून दिली आणि संघर्षाची ताकद दिली.

आज बाबासाहेब केवळ एका समाजाचे नेते नाहीत; ते संपूर्ण राष्ट्राचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी लोकांच्या मनांवर जे राज्य केले आहे, ते कोणत्याही राजाच्या सत्तेपेक्षा मोठे आहे कारण ती सत्ता प्रेमाची, विश्वासाची आणि न्यायाची आहे. जगातील अनेक राजे विस्मरणात गेले पण बाबासाहेबांचे विचार आजही जिवंत आहेत प्रत्येक त्या मनात, जे अन्यायाविरुद्ध उभे राहते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त, केवळ अभिवादन करून चालणार नाही. त्यांच्या विचारांना कृतीत उतरवणे, हीच खरी आदरांजली ठरेल. ज्ञान, समता, न्याय आणि बंधुतेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३६ व्या जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!!

**-प्रविण बागडे,नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# बाप दिव्यांग होता,पोराने जपली माणुसकी!

## मूकबधिर व मतिमंद मुलांच्या चेहऱ्यावर फुलवले हास्य; बालाजी कांबळे यांच्या सेवाव्रताचे सर्वत्र कौतुक

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो ही केवळ ओळीतली भावना नसून ती कृतीत उतरवणारे व्यक्तिमत्व म्हणजे देगलूरचे बालाजी यादवराव कांबळे. आपल्या दिव्यांग वडिलांच्या संघर्षाची जाण ठेवून, बालाजी यांनी नांदेडमधील मूकबधिर व मतिमंद विद्यार्थ्यांच्या साहित्याची मोफत दुरुस्ती करून माणुसकीचा एक नवा वस्तुपाठ घालून दिला आहे.वडिलांच्या स्मृतीतून मिळाली सेवेची प्रेरणा

बालाजी कांबळे यांचे वडील स्वतः दिव्यांग होते. दिव्यांगांचे आयुष्य आणि त्यांच्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. वडिलांच्या पश्चात, त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि दिव्यांग बांधवांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बालाजी यांनी सेवेचा मार्ग निवडला. दि. ११ एप्रिल रोजी त्यांनी नांदेड येथील मगनपुरा भागातील 'श्री रामप्रसाद मालपाणी मूकबधिर विद्यालय' आणि 'आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय' या दोन्ही विद्यालयांना भेट दिली.या भेटीदरम्यान बालाजी यांनी पूर्ण वेळ थांबून



दोन्ही विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या तुटलेल्या चपला, बूट, स्कूल बॅगची चैन, स्वेटरची चैन आणि फाटलेली दप्तरे अत्यंत कल्पकतेने शिवून आणि दुरुस्त करून दिली. व्यावसायिक कामातून वेळ काढून, कोणतीही फी न घेता त्यांनी दिलेली ही 'मोफत दुरुस्ती सेवा' पाहून विशेष मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमलले.

कर्तव्याची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी जपत

देगलूर येथील पथविक्रेता समितीचे सदस्य असलेले बालाजी कांबळे स्वतः दिव्यांग नसले, तरी त्यांच्या मनात या मुलांबद्दल अपार प्रेम आहे. माझ्या वडिलांनी दिव्यांग असूनही कष्ट केले, त्यांची आठवण म्हणून मी या मुलांच्या उपयोगी पडू शकलो, याचे मला मोठे समाधान आहे, अशी भावुक प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि पालकांनी बालाजी कांबळे यांच्या या निस्वार्थ उपक्रमाचे जोरदार स्वागत केले असून, त्यांच्या या कार्याचा आदर्श सर्वच स्तरांतून घेतला जात आहे. सोशल मीडियावरही त्यांच्या या 'सेवाव्रताची' मोठी चर्चा होत असून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# माजलगावची लेक पुन्हा अव्वल! किरण नरवडे सलग दुसऱ्या वर्षी कॉलेजमध्ये पहिली

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्याची हुशार आणि जिद्दी कन्या किरण नरवडे हिने पुन्हा एकदा यशाचा झेंडा रोवला आहे. महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत तिने ७६.०४% गुण मिळवत आपल्या कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, किरणने सलग दुसऱ्या वर्षीही हे यश संपादन करत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

गेल्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतलेल्या किरणने यंदाही तीच परंपरा कायम ठेवली आहे. कोल्हापूर व सांगलीसारख्या शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या भागांतील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत बीड



जिल्ह्यातील माजलगावची ही लेक अव्वल ठरली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरत आहे. किरणच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याचा मान उंचावला असून, सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि नरवडे कुटुंबीयांनी तिच्या यशाचा अभिमान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या किरणने मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. तिच्या या कामगिरीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणास्थान ठरली आहे.

किरण नरवडेच्या या घवघवीत यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भविष्यातही ती असेच यश संपादन करून माजलगावचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सावत्र बापाचा १३ वर्षीय मुलीवर अत्याचार, नात्याला काळीमा फासणारी आठवड्यातील दुसरी घटना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका खेडे गावात नात्याला काळिमा फासणारी आठवड्यातील दुसरी घटना उघडकीस आली असून अवघ्या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर चक्क तिच्या सावत्र बापाने लैंगिक अत्याचार केला असून, या नराधमावर केज पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पीडित मुलीच्या आईचे तीच्या पतीसोबत मतभेद झाल्यामुळे तीने त्याच्या पासून नऊ वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला होता. त्यानंतर तिने आरोपी सोबत दुसरे लग्न केले होते.या दुसऱ्या लग्ना पासून त्यांना एक मुलगाही झाला आहे. गुरूवार दि.९ एप्रिल रोजी




पीडित अल्पवयीन मुलीची आई तिच्या माहेरी गेल्याची संधी साधून दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान सावत्र पित्याने घरी येऊन मुलगी घरी एकटीच असल्याचे पाहून त्याने गैरफायदा घेतला.साडे तीन वर्षांच्या मुलाला खेळायला मोबाईल देऊन त्यात गुंतवून ठेवले आणि अल्पवयीन मुलीशी लज्जास्पद चाळे केले.अल्पवयीन मुलीने त्याला विरोध करून आईला सांगण्याची धमकी दिली.मात्र, आईला सांगायचे नसते, आपल्यात भांडणे होतील,असे म्हणून त्याने मुलीवर बळजबरीने अत्याचार केला.आई घरी आल्यानंतर मुलगी नाराज असल्याचे तिच्या निदर्शनास आले.आईने विचारले असता सुरुवातीला मुलगी प्रचंड घाबरलेली असल्याने काहीच बोलली नाही, मात्र आईने विश्वासात घेऊन विचारल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार आईला सांगितला.त्यानंतर पीडितेच्या आईने केज पोलिस ठाण्यात धाव घेत नराधम सावत्र पित्याविरोधात केज पोलिसात तक्रार दाखल केली.दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.

# संसदीय लोकशाहीचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि संसदीय लोकशाहीचे जनक म्हणून ज्या महामानवाला संपूर्ण जगात ओळखले असे भारतरत्न डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा आज १४ एप्रिल जन्म दिवस.



दिनकर जाधव
७०८३२७२७७७

भारत देशात असलेली संसदीय लोकशाही ही संपूर्ण जगामध्ये सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. कारण सर्वात जास्त मतदार हे भारत देशात असल्यामुळे आणि आपल्या देशामध्ये संसदीय लोकशाही असल्यामुळे भारत देश हा जगातील एकमेवाद्वितीय संसदीय लोकशाही असलेला सर्वात मोठा देश म्हणून गणला जातो. लोकशाहीमुळे सर्वसामान्य ते सर्वात श्रीमंत असलेल्या व्यक्तींनाही एकच कायदा आहे. त्यामुळे येथे कायद्याने सर्व सम-समान आहेत. जेवढा अधिकार पंतप्रधानांना आहे तेवढाच अधिकार ग्रामपंचायत मध्ये वावरत असलेल्या छोट्यात-छोट्या नागरिकालाही तोच अधिकार या संसदीय लोकशाहीमध्ये मिळालेला आहे. त्यामुळे हा हिंदुस्थान आज जो स्थिर देश आणि विकसनशील देश म्हणून या देशाकडे पाहिले जाते.

या आपल्या भारत देशात या संसदीय लोकशाही स्वीकारण्यामध्ये सिंहाचा वाटा उचलणारे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म १४ एप्रिल १८९१, महू, मध्य प्रदेश येथे झाला. रामजी व भीमाबाई यांचे ते १४वे अपत्य. त्यांनी १९२४ बहिष्कृत हितकारिणी सभा, १९२७ महाड चवदार तळे सत्याग्रह. पाणी पिण्याचा हक्क मिळवला,१९३० काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह नाशिक, पुणे करार. गांधीजींशी राखीव जागांवर समझोता. १९३६ स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना,१९४२ मजूर मंत्री अशी विविध प्रकारची कार्य करत वांचित आणि असंघटीत समाजासाठी कामे करत असताना देश एकसंघ कसा राहील यावर त्यांनी आपली जीवाची बाजी लावली. २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. २ वर्ष ११ महिने १८ दिवस काम करून जगातील सर्वात मोठे लिखित संविधान दिले. अशा या विश्वरत्नास जयंतीनिमित्त कोठी कोठी वंदन...

# वन्यजीवांसाठी वनविभाग सरसावला!

## देगलूर-बिलोली वनपरिक्षेत्रात कृत्रिम पाणवटे ओसंडून वाहिले



दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाची तीव्रता आणि जंगलातील नैसर्गिक जलस्त्रोत आटल्याने वन्यप्राण्यांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्यासाठी देगलूर वनविभागाने पुढाकार घेतला आहे. आज दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी, देगलूर,व बिलोली वनपरिक्षेत्रातील मौजे अंजनी, मुतण्याल आणि केरूर शिवारातील कृत्रिम सिमेंट पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्यात आले.श्रीमती मनीषा पाटील (IFS, उपवनसंरक्षक नांदेड) आणि श्री. भारत खेळबाडे (सहाय्यक वनसंरक्षक, तेंदू व कॅम्पा, नांदेड) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वाढत्या उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव घ्यावी लागू नये, या उद्देशाने श्री. रामराव देवकते (वनपरिक्षेत्र अधिकारी, देगलूर प्रा.) यांनी हे तातडीचे आदेश दिले होते. या मोहिमेत प्रत्यक्ष फिल्डवर श्री. अभय सेवलकर (वनपरिमंडळ अधिकारी, देगलूर) आणि श्री. सहदेव दोसलवार (वनरक्षक, केरूर) यांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा करून सर्व सिमेंट पाणवटे भरून घेतले आहेत. यामुळे हरिण, नीलगाय, रानडुक्कर यांसारख्या अनेक वन्यजीवांची तहान भागणार असून वनविभागाच्या या तत्परतेचे पर्यावरणप्रेमींकडून कौतुक होत आहे.जंगलात पाणी उपलब्ध करून दिल्याने वन्यजीव सुरक्षित राहण्यास मदत होईल. उन्हाळा संपेपर्यंत ही पाणीपुरवठ्याची साखळी कायम राखली जाईल, असे वनविभागाच्या वतीने सांगण्यात आले.

# देगलूर नगर परिषद क्षेत्रात नमो उद्यानासाठी १ कोटींचा निधी मंजूर



दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग, मुंबई यांच्या दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत देगलूर नगर परिषद क्षेत्रात ह्यनमो उद्यानह्न विकसित करण्यासाठी रुपये १ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मधील शिवनेरी भागात नगर परिषदेच्या खुल्या जागेवर उद्यान उभारणीसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून, या कामाचा शुभारंभशनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता उत्साहात पार पडला.

या प्रसंगी नगराध्यक्ष सौ. विजयमाला बालाजी टेकाळे, उपनगराध्यक्ष अंकुश देसाई देगावकर, नगरसेवक लक्ष्मीकांत पदमवार सावकार तसेच नगर परिषदेच्या मुख्याधिकारी कांबळे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगरसेवक नंदू शेठ शाखावर, व्यंकट कांबळे, द्याडे आप्पा, अनिल बोन्डलावार, दिगंबर कडलवार, दिगंबर कौरवार, बालाजी मैलार्गीर, सुमंत कांबळे, सय्यद अजिज भाई, पाशाभाई तसेच नगरसेविका उज्वलाताई पदमवार, योगेश्वरी ताई तोटावार, रोहिणी ताई मैलार्गीर, अंजली ताई देसाई, बोन्डलावार ताई आदींची उपस्थिती लाभली.

यासोबतच परिसरातील नागरिकांमध्ये श्रीरंग पाटील भाटापुरकर, एकनाथ पाटील वडगावकर, व्यंकटराव भोसले, खंडागळे सर, हाडोळे सर, हनमंत पदलवार, अनिल तोताडे, वारे सर, पाळेकर गोविंदराव, भडके सर, गोविंद तोटावार, भास्कर माळेगावकर यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे देवेंद्र शेठ मोतेवार, माधव फुलारी, संतोष उनगतवार, सय्यद सर, शैलेंद्र चव्हाण, अथर हाश्मी, खालिद पटेल, मिलिंद बिरकगन, रवी मोरे, अनिल कोंडेकर, विकास मोरे, विक्रम नाकशेट्टीवार, गजूभाऊ कांबळे, शशांक पाटील, योगेश मैलार्गीर, कृष्णा माळेगावकर, शुभम चेनपुरे, सचिन कांबळे, सुरज सोनकांबळे आदी कार्यकर्त्यांचीही लक्षणीय उपस्थिती होती.

शिवबा, शिवनेरी नाथ नगर, हनुमान नगर या परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत या उपक्रमाचे स्वागत केले. ह्यनमो उद्यानल उभारणीमुळे परिसरात हरित वातावरण निर्माण होऊन नागरिकांना विरंगुळ्याचे तसेच आरोग्यदायी सुविधा उपलब्ध होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी १७ एप्रिलला बीड मध्ये मोर्चा; खासदार बजरंग सोनवणे यांचा जाहीर पाठिंबा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात न्याय्य हक्क मिळावेत या प्रमुख मागणीसाठी बीड येथे दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी भव्य मुस्लिम आरक्षण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला बजरंग मनोहर सोनवणे यांनी जाहीर पाठिंबा दर्शविल्याने आंदोलनाला मोठे बळ मिळाले आहे.याबाबत सकल मुस्लिम आरक्षण कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेल्या अधिकृत पत्रात सोनवणे यांनी मुस्लिम समाजाच्या मागण्यांना पाठिंबा देत स्पष्ट भूमिका मांडली आहे. मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत आवश्यक असून, ही मागणी सामाजिक न्यायाच्या दृष्टीने योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.



पत्रात पुढे त्यांनी म्हटले आहे की, राज्यातील अनेक मागास व वंचित घटकांप्रमाणेच मुस्लिम समाजालाही समान संधी उपलब्ध करून देणे ही शासनाची नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. शिक्षण, रोजगार व आर्थिक उन्नती या क्षेत्रात मुस्लिम समाज मागे राहिल्याचे वास्तव लक्षात घेता, शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, बीडमध्ये आयोजित करण्यात येणारा हा मोर्चा लोकशाही मार्गाने, शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या मोर्चामध्ये राज्यभरातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक यांचा देखील या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे.या मोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून घेऊन मुस्लिम आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आंदोलनामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता असून, आगामी काळात या विषयावर राजकीय पातळीवरही हालचाली वेग घेण्याची चिन्हे आहेत.खासदार सोनवणे यांनी आपल्या पत्रात या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देत, मोर्चा यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तसेच लोकशाही पद्धतीने मांडल्या जाणाऱ्या या मागण्यांची शासनाने दखल घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे

# औसा येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क
**औसा । महेश कोळी**

सत्यशोधक चळवळीचे जनक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची ११ एप्रिल २०२६ रोजी औसा येथील जयंती समितीच्या वतीने संतोष सावता माळी चौक औसा येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी वीरशैव समाजाचे अध्यक्ष सुभाष आप्पा मुक्ता, महाराष्ट्र माळी सेवा संघाचे तालुका अध्यक्ष सचिन माळी, जयंती समितीचे अध्यक्ष खंडेराव क्षीरसागर व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंती समितीच्या वतीने



औसा शहरातील सर्व जाती-धर्माच्या अध्यक्ष महोदयांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी नगरपरिषद सदस्य शिल्पा कुलकर्णी, अश्विनी स्वामी आणि पियुष मेहत्रे यांची उपस्थिती होती. जयंती समितीच्या वतीने सर्वश्री प्रदीप मोरे, संतोष वर्मा, विवेक मिश्रा, पप्पू गवळी, भगवानराव देशपांडे, हनुमंत कांबळे, दत्ता पुंड, सिद्धेश्वर सुरवसे, शिवाजी कुंभार,नगरसेवक आनंद बनसोडे, पत्रकार राम कांबळे, आत्माराम मिरकले, संभाजी शिंदे, माळी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते नारायणराव माळी आणि विठ्ठल माळी यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री चांगदेव माळी, वसंतराव फुटाणे, शिवमूर्ती सुतार, महारुद्र वाकसे, हिरालाल मिश्रा, गणेश माळी, आकाश माळी, प्रसाद फुटाणे, विकास माळी, विशाल माळी, भागवत म्हेत्रे, मारुती माळी, प्रकाश फुटाणे यांच्यासह जयंती समितीचे सर्व पदाधिकारी प्रयत्नशील होते.सायंकाळी पाच वाजता औसा शहरातून जयंती समितीच्या वतीने महात्मा फुले यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत औसा शहरातील हजारो नागरिक सहभागी झाले होते.

# फुले-आंबेडकर अनुबंधातूनच समृद्ध भारताची निर्मिती-उपायुक्त रवींद्र जोगदंड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडलेला सामाजिक समतेचा विचार आणि त्या विचारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला भक्कम संवैधानिक आधार, याच वैचारिक अनुबंधातून आजच्या समृद्ध भारताची निर्मिती झाली आहे. १९४७ पासून २०२६ पर्यंतच्या भारताच्या महासत्तेकडील प्रवासात भारतीय संविधानाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा.रवींद्र जोगदंड यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि.११ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. 'क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुबंध' या विषयावर त्यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा. प्रदीप रोडे होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीडचे सहाय्यक उपायुक्त मा.उमेश सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मा.डी.बी. क्षिरसागर, माजी प्राचार्य मा.डॉ.कमलाकर कांबळे, उपशिक्षणाधिकारी मा.भगवान सोनवणे, तसेच मा.दीपा रोडे आदी मान्यवर उपस्थित होते.आपल्या मार्गदर्शनात जोगदंड यांनी फुले व आंबेडकर यांच्या विचारांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजात समता, शिक्षण आणि स्त्री-मुक्तीचा जो पाया रचला, त्या विचारांना डॉ.आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून संस्थात्मक व कायदेशीर बळ दिले. मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण हाच एकमेव प्रभावी मार्ग असून शाहू-फुले-आंबेडकर विचारधारा ही परस्परांशी घट्ट जोडलेली आहे. हीच विचारधारा आजच्या पिढीने वारसा म्हणून पुढे नेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वातंत्र्यानंतर भारताने साधलेली प्रगती ही भारतीय संविधानामुळेच शक्य झाली आहे. आज भारत महासत्तेकडे वाटचाल करत असून या प्रवासामागे राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, हे विसरता कामा नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, फक्त कार्यक्रम आयोजित करून थांबायचे नाही, तर त्यातून स्वतःला घडवणे आवश्यक आहे. आयुष्यात यश मिळवायचे असेल, तर स्वतःप्रति प्रामाणिक राहून वेळेचे महत्त्व ओळखून सातत्याने अभ्यास करणे गरजेचे आहे, असा प्रेरणादायी संदेश दिला. तसेच यावेळी त्यांनी जूनपासून स्टुडंट ऑफ द इयर उपक्रम सुरू करण्यासह प्रत्येक रविवारी अभ्यास उपक्रम राबविण्याचा निर्णय जाहीर केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमास तुलसी समूहातील विविध शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तहसीलदार गिड्डे अपघात प्रकरणी सखोल चौकशीची मागणी; संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी सखोल,निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्यात यावी,अशी मागणी संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे,राकेश गिड्डे हे कर्तव्यदक्ष,प्रामाणिक व जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारे अधिकारी होते.त्यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण केज तालुका व बीड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.मात्र, त्यांच्या मृत्यू विषयी निर्माण झालेल्या संशयास्पद परिस्थिती मुळे हा अपघात आहे की घातपात,याबाबत जनतेत शंका निर्माण झाली आहे

विशेषतः अपघातानंतर घटनास्थळावरून मोबाईल फोन व महत्त्वाचा डेटा असलेला लॅपटॉप गायब झाल्याची बाब अत्यंत गंभीर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तसेच,अपघाताच्या दिवशी त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तींचे मौनही संशय अधिक गडद करणारे असल्याचे म्हटले आहे.या पार्श्वभूमी वर,संपूर्ण घटनेचीसखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी,तसेच आवश्यक असल्यास उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या प्रकरणा ची सत्यता लवकर समोर येणे हेच दिवंगत अधिकाऱ्याला खरी श्रद्धांजली ठरेल,असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.हे निवेदन संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे यांच्या नेतृत्वा खाली देण्यात आले.यावेळी महेंद्र मोरे विभागीय उपाध्यक्ष, राहुल डावकर तालुका अध्यक्ष बीड,नितीन गुजर,जीवन घोलप शहर अध्यक्ष पाटोदा आदी उपस्थित होते व त्यांनीही या निवेदनावर सह्या करून प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी,अशी मागणी करण्यात आली आहे.

## गाडगेबाबांच्या विचारांची परंपरा जपणाऱ्या सभेत फुले जयंती उत्साहात, बारुळकरांना श्रद्धांजली

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**



कृतिशील समाज सुधारक,सत्यशोधक धर्माचे संस्थापक आणि शैक्षणिक,सामाजिक क्रांतीचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड येथे अभिवादन करण्यात आले.याच वेळी शिव- शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचे किर्तन - प्रवचनातून जनप्रबोधन करणारे ह.भ.प.मधुकर महाराज बारुळकरयांच्या अकाली निधनाबद्दलही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गाडगेबाबांच्या समाज सुधार अभियानाची पताका खांद्यावर घेत चळवळ पुढे नेणारे ह.भ.प.संतोष महाराज डोंगरे यांच्या निवास स्थानी आयोजित अभिवादन सभेत विविध मान्यवरांनी उपस्थित राहून आपली श्रद्धांजली अर्पण केली.जेष्ठ शिक्षक नेते व मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी.तांदळे,आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अशोक येडे,प्रबोधनकार ह.भ.प.नितीन महाराज पिसाळ,लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे,मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे,पर्यावरण प्रेमी अभिमान खरसाडे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष गणेश मस्के,मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रा.पंजाब येडे तसेच अनेक पदाधिकारी,शिक्षक व प्राध्यापकांनी यावेळी आपापल्या भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संयोजक ह.भ.प.संतोष महाराज डोंगरे यांनी मानले,तर सुत्रसंचालन ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज उबाळे यांनी केले.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जपत समाज प्रबोधनाची गरज अधोरेखित केली.

## तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या मृत्यू बाबत कुटुंबियांकडून संशय व्यक्त;बेपत्ता वस्तू आणि मित्रांमुळे गूढ वाढले

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा कार अपघातात झालेला मृत्यू संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून,त्यांच्या कुटुंबीयांनी याप्रकरणी घातपाताची शक्यता व्यक्त केली आहे.दि.९ एप्रिल गुरुवार रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास रेणापूर फाट्या जवळ हा अपघात झाला होता.मात्र,घटनास्थळा वरून राकेश गिड्डे यांचा लॅपटॉप,टॅब आणि मोबाईल यांसारख्या महत्त्वाच्या वस्तू बेपत्ता असल्याने हा संशय बळावला आहे.मयताचे बंधू अक्षय गिड्डे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातावेळी सोबत असणारे त्यांचे मित्रही तेव्हापासून बेपत्ता असून त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही.शव विच्छेदन अहवालात त्यांच्या सातही बरगड्या तुटल्याचे आणि डोक्याला मार लागून अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याचे समोर आले आहे.या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी



कुटुंबीय दि.२१ एप्रिल नंतर रेणापूर पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल करणार आहेत.दरम्यान, राकेश गिड्डे अंबाजोगाई येथे बदलीसाठी प्रयत्नशील होते.त्यासाठी त्यांनी आमदार नमिताताई मुंदडा यांच्याकडून शिफारस पत्रही घेतले होते अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.दरम्यान या अपघाता विषयी जनतेच्या मनात संभ्रम निर्माण झाला असून या अपघाताची चौकशी करून सत्यता समोर आली पाहिजे अशी मागणी केली जात आहे.

## गांजा विक्री प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

गांजा विक्री प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीस जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, माजलगाव यांनी जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले असून कायदेशीर बाजू मांडण्यात बचाव पक्षाला यश आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी बसस्टॉपसमोर रस्त्यावर दोन संशयित इसम उभे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली असता त्यांनी आपली नावे ऋषिकेश राजू राठोड व अक्षय छगन राठोड अशी सांगितली. त्यांच्याकडे असलेल्या लाल रंगाच्या पिशवीबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. संशय वाढल्याने पंचांच्या उपस्थितीत पिशवीची तपासणी करण्यात आली.



तपासणीदरम्यान पिशवीतून तीव्र वास येत असल्याचे लक्षात आले. अधिक चौकशी केली असता संबंधित पिशवीत गांजा असल्याची कबुली आरोपींनी दिली. तसेच ते टाकरवन फाटा येथे रात्रीच्या वेळी ट्रक चालकांना गांजा विक्री करत असल्याचेही समोर आले. पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये एकूण ७९ लहान-मोठ्या पुड्या व एक कागदी पुडी अशा ८० पुड्यांमध्ये सुमारे १.१८२ किलो गांजा आढळून आला.

या प्रकरणी ग्रामीण पोलिस स्टेशन, माजलगाव येथे गुंगीकारक औषधद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत कलम ८(उ) व २०(ल) नुसार गुन्हा क्रमांक ११९/२०२६ दाखल करण्यात आला. त्यानंतर दोन्ही आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आली होती.

अटक झाल्यानंतर आरोपी ऋषिकेश राजू राठोड याच्यावतीने मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, माजलगाव येथे ॲड. आर. के. गवते यांच्या मार्फत जामीन अर्ज दाखल करण्यात आला. या जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान ॲड. गवते यांनी कायदेशीर मुद्द्यांवर सखोल व प्रभावी युक्तिवाद केला. तसेच त्यांनी सादर केलेली कागदपत्रे न्यायालयाने ग्राह्य धरली.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. बचाव पक्षाकडून ॲड. व्ही. बी. लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. आर. के. गवते यांनी आरोपीची बाजू प्रभावीपणे मांडली, तर त्यांना ॲड. एन. आर. जवळे यांनी सहकार्य केले.

या निर्णयामुळे प्रकरणातील पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले असून, कायद्याच्या चौकटीत पुढील कार्यवाही होणार आहे.

## बनसारोळा येथे करू वंदन जोतिबांना संगीत मय आविष्कारातून महात्मा फुलेंना अभिवादन



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त क्रांतिसूर्य प्रतिष्ठान,बनसारोळा च्या वतीने आयोजित करू वंदन जोतिबांना हा संगीतमय कार्यक्रम अत्यंत चैतन्यपूर्ण आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला.सुरांच्या आणि शब्दांच्या माध्यमा तून महापुरुषांच्या विचारांचा जागर करत ग्रामस्थांना मंत्रमुग्ध करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन रमेशराव आडसकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून युसुफ वडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी क्रांतिसूर्य प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेले स्वररत्न सुभाष शेप आणि शाहीर मामा काळे यांनी आपल्या सहकाऱ्यां सह महा पुरुषांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी गीते सादर केली. क्रांतिसूर्य प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजात एकोपा आणि प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य सातत्याने करत आहे. भविष्यातही असेच सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय काळे यांनी केले, तर संपूर्ण सूत्रसंचलन शाहीर तुकाराम सुवर्णकार यांनी केले.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवा-कास्ट्राईब

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणातील उपवर्गीकरण संदर्भात नेमलेल्या न्या.बदर समितीचा अहवाल घोषित न करताच त्यावर हरकती व सूचना राज्य सरकारने मागविल्या आहेत.मुळात शासनस्तरावर अती वेगाने याबाबत कार्यवाही सुरू आहे. सेवानिवृत न्यायाधीश अनंत बदर यांची समिती नियुक्त, अहवाल प्राप्त,कॅबिनेट मध्ये चर्चा आणि मुख्यसचिव यांची समिती नियुक्त व एक महिन्यात या समितीचा अहवाल मागणे. ही सर्व अतिशय वेगवान प्रक्रिया आहे. यामागे सरकारचा हेतू स्वच्छ व सामाजिक न्यायाचा दिसत नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने एवढेच म्हटले की उपवर्गीकरण होऊ शकते.राज्य सरकार करू शकते. परंतु केलेच पाहिजे असे बंधन घातले नाही. एम्पिरिकल डाटा,ज्या आधारे उपवर्गीकरण करायचे तो योग्य असला पाहिजे असेही निर्देश आहेत. जनगणना २०२७ चा डाटा उपलब्ध झाल्यावर याबाबत विचार करण्यात यावा.व सदरील प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी अशी मागणी ईमेलद्वारे कास्ट्राईब कडून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना करण्यात आली आहे. उपवर्गीकरणाची कार्यवाही संविधानाच्या अनुच्छेद १४,१५,२१ व ४६ शी सुसंगत नाही. उपवर्गीकरण व्यावहारिकही नाही. उपवर्गीकरण केले तरी प्रत्येक गटात अती मागास राहणारच आहेत. अती मागासवर्गास लाभ देण्यासाठी उपवर्गीकरण हा उचित मार्ग नाही. उपवर्गीकरणासाठी जनगणनेचा अद्यावत डाटा उपलब्ध असणे आवश्यक आहे. २०११ च्या जनगणनेचा डाटा १५ वर्षापूर्वीचा आहे, त्यामुळे तो वापरता येणार नाही, खरे चित्र समोर येणार नाही. तेव्हा जनगणना २०२७ चा डाटा आल्यावर तो विचारात घेण्यात यावा. माननीय न्या.अनंत बदर यांचा अहवाल सार्वजनिक करण्यात आला नाही. त्यामुळे या अहवालात नेमके काय आहे? कशाचा आधार घेतला आहे? काय शिफारशी आहेत?हे कळायला मार्ग नाही. अहवाल सार्वजनिक करावा म्हणजे मुख्य सचिव समिती कडे योग्य आक्षेप नोंदविता येतील. सरकारने सगळ्या क्षेत्रात आरक्षण धोरणाची अंमलबजावणी इमानदारीने केली नाही. टक्केवारीनुसार अनुसूचित जातीची आरक्षित पदे, पदोन्नतीसह, प्रथम भरावीत. संविधानाने दिलेले आरक्षण हे राजकीय क्षेत्र, शिक्षण व सार्वजनिक सेवा, केंद्र व राज्य सरकारला लागू आहे. जातीनिहाय महामंडळे असताना अतिमागास यांना न्याय मिळाला नाही तर उपवर्गीकरणाने न्याय कसा मिळेल? महत्वाचा मुद्दा असा की सर्व क्षेत्रातील प्रतिनिधित्व ठरविण्यासाठी अनुसुचित जातीच्या महार व धर्मांतरित बौद्ध यांची एकत्रित लोकसंख्या विचारत घ्यावी. अनुसूचित जातीच्या महार समाजाने संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन बुद्धाचा विचार स्वीकारला, बौद्ध झाले, उच्चशिक्षण घेतले आणि प्रगती केली. या द्वेषामुळे उपवर्गीकरण जलद गतीने होत आहे असे दिसून येते.त्यामुळे एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता ही प्रक्रियाच तात्काळ थांबवावी अशी आग्रही मागणी कास्ट्राईब कडून करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077